# प्रकरण – १३

## अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पध्दत

१३.१ या रुग्णालयात गरीब धर्मादाय निधीची (पुअर बॉक्स चॅरिटेबल फंड) व्यवस्था उपलब्ध आहे. जर एखाद्या रुग्णाकडे त्याच्यावरील उपचारांसाठी लागणा-या निधीची उपलब्धता नसेल तर त्यांना समाज विकास अधिकारी यांचेकडे मुलाखतीसाठी पाठविले जाते. सदर समाज विकास अधिकारी रुग्णाची / रुग्णाच्या नातेवाईकाची मुलाखत घेऊन त्या रुग्णाची आर्थिक स्थिती ठरवितात. जर रुग्णाची आर्थिक स्थिती गरीब असेल आणि त्यामुळे जर तो पैसे भरु शकत नसेल तर त्याला वैद्यकीय अधिक्षक यांचेकडे शुल्कामध्ये सवलतीसाठी शिफारशीसह पाठविले जाते.

१३.२ परिपत्रक क्र.एच.ओ./८६४८९/पी.बी.एस. दि.१७/०७/१९९८ नुसार गरीब धर्मादाय निधीमधून एकावेळी रु.५०००/- पर्यंत खर्च करण्याबाबत मर्यादा आहे.

१३.३ परिपत्रक क्र. टी.आर.व्ही./२०४ दिनांक ०९.०५.२००० मधील तरतूदींनुसार वैद्यकीय अधिक्षक गरीब रुग्णाला होणा-या खर्चात २०% सवलत देऊ शकतात.

१३.४ महाराष्ट्र राज्य शासनाची 'महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना' ह्या रुग्णालयामध्ये कार्यान्वित आहे.

शासनाच्या ह्या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या गरीब लोकांवर उपचार करणे आहे. शासनाने 'राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना' दिनांक १ एप्रिल २०१७ पासून 'महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना' या नावाने सुरू ठेवण्यास मान्यता दिली आहे.

महाराष्ट्र राज्याचे नागरिक असलेले, उत्पन्न रु.एक लाखापेक्षा कमी असलेले, ज्यांच्याकडे पिवळे किंवा केशरी रंगाचे रेशन कार्ड आहे अशी कुटुंबे तसेच नैसर्गिक आपत्तीने ग्रस्त असलेले शेतकरी या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र आहेत. या योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबाला प्रति वर्ष रु.दीड लाखापर्यंतचे विमा संरक्षण उपलब्ध करुन देण्यात येते. मूत्रपिंड प्रत्यारोपण मर्यादा प्रतिवर्ष रु.अडीच लाखापर्यंत आहे. लाभार्थी कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीला किंवा अनेक व्यक्तीला योजनेचा लाभ

घेता येतो. या योजनेअंतर्गत  विशेष सेवांतर्गत ७७१ उपचार व शस्त्रक्रिया तसेच १२१ पाठपुरावा सेवांचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थी रुग्णास निशुल्क वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. लाभार्थी रुग्णांची नोंदणी, उपचारांदरम्यान सहाय्य तसेच मार्गदर्शन करण्यासाठी आरोग्य मित्रांची नियुक्ती शासनाने केली आहे. या रुग्णालयात आरोग्य मित्र यांची सेवा उपलब्ध आहे.

या योजनेत अर्ज सादर करण्यासाठी रुग्णांना आधार कार्ड, रेशन कार्ड, सरकारी डॉक्टरांनी दिलेले आजाराचे प्रमाणपत्र, वय प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे तीन फोटो व उत्पन्नाचे प्रमाणपत्र या कागदपत्रांची आवश्यकता आहे.

...........